दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे । संपादक : प्रशांत पाटील ठाकरे
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ सोमवार, ०३ ऑगस्ट २०२६ ■ वर्ष : ३ ■ अंक : १०६ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

# शैक्षणिक संस्थांनी कालसुसंगत मनुष्यबळ घडविण्यावर भर द्यावा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्र जीत

**नागपूर :** शैक्षणिक संस्थांनी आता नोकऱ्यांच्या क्षेत्रातील गरजा लक्षात घेऊन रोजगारक्षम, अत्याधुनिक कौशल्यांनी सज्ज, कालसुसंगत मनुष्यबळ घडविण्यावर भर दिला पाहिजे. आजच्या नोकऱ्यांच्या क्षेत्राला केवळ पदवीधरांची गरज नाही, तर अर्थपूर्ण योगदान देणाऱ्या गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाची गरज आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे बोलताना केले.

रामदेव बाबा विद्यापीठातील 'एआय सेंटर फॉर कॉम्पिटन्सी'च्या उद्घाटन समारंभात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.



याप्रसंगी श्रीरामदेवबाबा सार्वजनिक समितीचे अध्यक्ष पद्मश्री सत्यनारायण नुवाल, उपाध्यक्ष एस. राठी, पी. पालडीवाल, महासचिव राजेंद्र पुरोहित, सचिव ॲड प्रदीप अग्रवाल, कैलाशचंद्र अग्रवाल, कोषाध्यक्ष अशोककुमार पचेरीवाला, विद्यापीठाचे कुलपती डॉ. एस.एस. मंथा, कुलगुरु डॉ. आर.एस. पांडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना

## रामदेवबाबा वदियापीठातील 'एआय सेंटर फॉर कॉम्पटिन्सी' चे उद्घाटन

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, देशातील एक अग्रणी शैक्षणिक संस्था म्हणून रामदेवबाबा विद्यापीठाने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. शिक्षणाच्या मूळ उद्देशांशी स्वतःला जोडून ठेवत व्यापारीकरणापासून दूर राहण्याचे कार्य या संस्थेने केले आहे. खाजगी संस्था असूनही देशातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांमध्ये तिचा समावेश होतो. आज या संस्थेचे विद्यापीठात रूपांतर झाले आहे. संशोधनाच्या क्षेत्रात तसेच शिक्षणाला नवा आकार देणाऱ्या देशातील अत्यंत नामांकित विद्यापीठांमध्ये या विद्यापीठाचा समावेश होईल, असा विश्वास असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमिकॉन आणि क्वांटम कम्प्युटिंग तंत्रज्ञान हे या शतकाच्या भविष्याला आकार देणारे प्रमुख घटक ठरणार आहेत. औद्योगिक क्रांतीचा विचार केला तर पहिल्या औद्योगिक क्रांतीला १७४० च्या सुमारास, दुसरी १८६० च्या सुमारास आणि तिसऱ्या क्रांतीला १९५० च्या सुमारास सुरूवात झाली होती. तंत्रज्ञानातील वेगवान बदलांमुळे आज २०२६ मध्ये आपण पाचव्या औद्योगिक क्रांतीची चर्चा करीत आहोत. ही क्रांती कृत्रिम बुद्धिमत्ता, डीप टेक्नॉलॉजी आणि फ्रंटियर टेक्नॉलॉजीवर आधारित आहे. आता जगाने सहाव्या औद्योगिक क्रांतीची चर्चा देखील सुरू केली आहे, याकडे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी लक्ष वेधले.ज्या प्रचंड वेगाने तंत्रज्ञान तसेच व्यवसायाचे स्वरूप बदलत आहे, ते लक्षात घेता आपल्या शैक्षणिक संस्थांनी नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करणे आवश्यक आहे. बराच काळ आपण सीपीयूची चर्चा करीत होतो, आता जीपीयूची चर्चा करीत आहोत. क्वांटम कम्प्युटिंगमुळे संशोधन प्रक्रियेला अभूतपूर्व गती मिळाली आहे. बायोटेक्नॉलॉजी, रोबोटिक्स असो किंवा इतर कोणतेही क्षेत्र असो, तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात परिवर्तन घडत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे येत्या एक हजार दिवसांत नोकऱ्यांच्या क्षेत्रातील सुमारे ७० टक्के नोकऱ्यांचे स्वरूप आमुलाग्र बदलणार आहे. नोकऱ्या कमी होणार नाहीत, मात्र त्यांचे स्वरूप निश्चितच बदलेल. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे हा बदल अटळ आहे. त्यामुळे जग ज्या वेगाने बदलत आहे, त्या वेगाशी सुसंगत राहण्यासाठी आपल्या शिक्षण संस्थांनाही शिक्षणाच्या पद्धतीत बदल करावे लागतील, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

---

## स्वानंद मित्र मंडळाच्या वतीने पुर्ण प्राथमिक शाळा नागवे नं.१येथील मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, दहावी, बारावी,पदवीधर गुणवंतांचा सत्कार

महाराष्ट्र जीत

**कणकवली (प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) :** कणकवली तालुक्यातील नागवे या ग्रामीण भागात स्वानंद मित्र मंडळ कार्यरत आहे.समाजसेवक, गावचे सुपुत्र रवी नानचे आणि कुटुंबियांच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात.त्याच अनुषंगाने नागवे येथील जि.प.पूर्व प्राथमिक शाळा नं.१येथील विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.सरस्वती पुजन व दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.याप्रसंगी दहावी, बारावी, पदवीधर गुणवंतांचा विशेष सत्कार करण्यात आला.तसेच या.शाहू महाराज विद्यालय करंजे येथील मतीमंद मुलांनाही ब्लॅंकेट,टॉवेल आणि खाऊ वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला प्रमुख



पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य मनोज रावराणे, स्वानंद मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रवी नानचे, पंचायत समिती सदस्या दिव्या पेडणेकर, सिद्दिकी जाधव, नागवे गावच्या सरपंच सिद्दिकी जाधव,उप सरपंच महेंद्र कुडाळकर,मा. पंस.राजु पेडणेकर समाजसेवक, महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रकाश पाटकर, पत्रकार, जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, विजय ढवण, मुख्याध्यापक चोडणकर सर,क.ना.सा.पंचक्रोशि करंजे शिक्षक गवस सर,या.सरपंच बाळा सावंत समाजसेवक राजू पाटकर, उद्योजक अजय सावंत,सुधाकर मुले, नारायण खर्डेकर या.सरपंच नागवे.दिगंबर नानचे.पुंडलीक नानचे, यशवंत नानचे, चंद्रकांत सावंत शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, वैभव नानचे, अनुराधा मेस्त्री मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग सत्य प्रकाश सावंत, ग्रामपंचायत सदस्य संदेश सावंत,विद्यार्थी पालक आणि ग्रामस्थ महिला पूरुषआदी मान्यवर उपस्थित होते.

---

## ऋणानुबंध कार्यक्रमांतर्गत जेष्ठ शिक्षकांचा सपत्नीक सत्कार

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड :** सेवा निवृत्त शिक्षक संघर्ष समीती जिल्हा वाशिम यांच्या पुढाकारात अमृत जेष्ठ सेवा निवृत्तशिक्षक जे ८०ते९० या वयोगटात आहेत त्यांच्या घरी प्रत्यक्ष जाऊन त्यांचा पत्नी सत्कार दि ३१ जुलै रोजी करण्यात आला . सुखसमृद्धी, आनंददायी, आरोग्यदायी, सर्वांगीण सुखदायी राहण्यासाठी भेटी गाठी घेऊन सुखद गप्पा करण्यात आल्या. आपण १०० वर्षे जगून फक्त एक झाड लावा त्याचे संगोपन नातवंडासारखे करा म्हणजे आपली वसुंधरा वाचेल असा



सल्ला ही दिल्या गेली आणि कोणत्याही समस्या असल्यास त्या सोडविण्यासाठी प्रयत्नरत राहू असे आश्वासित करण्यात आले. भेटीत शालिग्राम ठाकरे बेंबळा, अनंतराव सवाई कामरगाव, सुरजुसे सर लाडेगाव, शंकरराव मस्के धनज बु यांच्या घरी जाऊन त्यांचा सपत्नीक सत्कार करून संवाद साधल्या गेल्याने आनंददायी वातावरण तयार झाले . आरोग्य विषयक वास्त पूस करण्यात आली .यावेळी जिल्हा अध्यक्ष संजय डवरे सर, ज्ञानेश्वर मांडेकर, माधव येवदेकर, सौ निर्मला गोंदेवार, सुधाकर बनारसे, गजानन शितगुरु सर इत्यादी सहभागी होते .

---




## जनतेच्या विश्वासाला विकासाची साथ; प्रत्यक्ष कार्यातून नेतृत्वाची अमोघ छाप

महाराष्ट्र जीत

**कारंजा : प्रतिनिधी :** कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सईताई डहाके यांच्या नेतृत्वाबाबत मतदारसंघात सकारात्मक वातावरण असल्याची प्रतिक्रिया अनेक नागरिक व कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधीच्या कार्याचे खरे मूल्यमापन हे मतदारसंघातील जनताच करत असते. त्यामुळे दूरस्थ ठिकाणाहून एकतर्फी भाष्य करण्यापेक्षा विकासकामे, जनसंपर्क आणि निवडणुकांमधून व्यक्त होणारे जनमत हेच नेतृत्वाचे खरे मापदंड असल्याचे मत स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, आमदार सईताई डहाके यांनी आमदारपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाची प्रथमच कसोटी लागली. कारंजा नगरपरिषदेच्या राजकीय इतिहासात भारतीय जनता पक्षाला यापूर्वी दोनपेक्षा अधिक नगरसेवक निवडून आणण्यात सातत्याने मर्यादित यश मिळत होते. मात्र, आमदार सईताई डहाके यांच्या नेतृत्वाखाली प्रथमच भारतीय जनता पक्षाने दुहेरी आकडा गाठत तब्बल १३ नगरसेवक विजयी करून ऐतिहासिक यश संपादन केले, असे नागरिक आवर्जून नमूद करतात.

याचबरोबर सहकार क्षेत्रातही पक्षाला महत्त्वपूर्ण यश मिळाले. आमदार सईताई डहाके



यांच्या नेतृत्वाखाली प्रथमच मध्यवर्ती सहकारी बँकेवर भारतीय जनता पक्षाचा संचालक निवडून आला आणि पक्षाचा झेंडा फडकला. स्थानिक राजकीय जाणकारांच्या मते, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकार क्षेत्रातील ही सलग यशस्वी कामगिरी नेतृत्वावरील जनविश्वास अधिक दृढ करणारी ठरली आहे. मतदारसंघातील नागरिकांच्या मते, आमदार सईताई डहाके या सातत्याने गावागावात जाऊन नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेतात. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, वीज तसेच इतर विकासकामांसाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करीत असल्याने त्या सर्वसामान्य नागरिकांना सहज उपलब्ध असलेल्या लोकप्रतिनिधी म्हणून ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरल्या आहेत.नागरिकांच्या प्रतिक्रिया लक्षात घेतल्या तर आमदार सईताई डहाके यांच्या नेतृत्वातील सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यांची सहज उपलब्धता, कार्याप्रती तत्परता, मानवी समाजाप्रती असलेली संवेदनशीलता, नागरिकांच्या अडचणींची जाण, प्रत्येक समस्या निकाली काढण्याचे कौशल्य आणि सर्वांना समान न्याय देण्याची भूमिका. या गुणांमुळे त्या आज मतदारसंघातील नागरिकांच्या गळ्यातील "ताईत" बनल्या असल्याची भावना अनेक नागरिक व्यक्त करीत आहेत.

राजकीय विश्लेषकांच्या मते, कोणत्याही लोकप्रतिनिधीबाबत मत व्यक्त करताना प्रत्यक्ष विकासकामे, नागरिकांचा प्रतिसाद आणि निवडणुकांमधून मिळालेला जनादेश यांचा वस्तुनिष्ठ विचार होणे आवश्यक आहे. केवळ दूरस्थ ठिकाणाहून केलेल्या टीकेपेक्षा जनतेने दिलेला कौल अधिक महत्त्वाचा असतो, असे मतही व्यक्त केले जात आहे.राजकीय टीका ही लोकशाहीचा अविभाज्य भाग असला तरी ती वस्तुनिष्ठ आणि तथ्याधारित असावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. कारंजा नगरपरिषद निवडणुकीतील भारतीय जनता पक्षाचे ऐतिहासिक यश, सहकार क्षेत्रातील वाढते प्रतिनिधित्व आणि मतदारसंघात सातत्याने सुरू असलेली विकासाभिमुख कामे ही आमदार सईताई डहाके यांच्या नेतृत्वावरील जनतेच्या विश्वासाची ठळक उदाहरणे असल्याची भावना मतदारसंघात व्यक्त होत आहे.

## संपादकीय

### हवा बदलते आहे!

उष्णतावाढीचे इशारे मिळतात, पण परिणामांच्या तीव्रतेचे अंदाज बांधता येत नाहीत आणि त्यामुळे भविष्यात प्रगत यंत्रणाही कमी पडू शकते, हा युरोपसाठीचा धडा.

हवा बदलते. ती कशी बदलते हे जंतरमंतरवरच्या आंदोलनाने अगदी एवढ्यातच दाखवून दिले असले तरी ‘त्या हवे’चा ‘या हवे’शी तसा काही संबंध नाही. आपल्याला बोलायचे आहे ते ‘हवापाण्याच्या गोष्टीं’मधल्या हवेबद्दल. बदल हा स्थायीभाव असलेल्या आजच्या जगात तर हरघडी ती म्हणजे हवा लहरीपणाच दाखवते. ऊन, वारा, पाऊस, थंडी कशाचीच खात्री नाही आणि हे चौघे कधी वेड्यासारखे वागून धुडगूस घालतील, याची शाश्वती नाही. दुष्काळाची तयारी करावी, तर पुराचे नियोजन करण्याची वेळ येते, उन्हाचे दिवस पावसाळी होतात, पावसाळ्याची सुरुवात उष्म्याच्या घातकतेचा अनुभव देते आणि थंडी अनेकदा नावालाही पडत नाही, तर कधी अचानक पांघरूणही पुरत नाही. हवामान बदल म्हणतात तो हाच का, याचे उत्तर काही हवामानतज्ज्ञ ठामपणे ‘हो’ असे देतात; काही जुने दाखले देऊन, ‘निष्कर्षापूर्वी थोडे थांबा’ म्हणतात. दरम्यान, हवा बदलते, बदलतच राहते…

नमनाला घातलेले हे परिच्छेदभर शब्द हवेच्या बाबतीत जगात दोन ठिकाणी घडणाऱ्या घटनांतून निर्माण होत असलेल्या अचंब्यामुळे. त्यात जितकी अनाकलनीयता आहे, तितकीच अनिश्चितताही – एकूण जगाच्याच भविष्याविषयीची. पहिली आहे युरोपातील. युरोपातले अनेक भाग सध्या शब्दश: जळत आहेत. तिथे उन्हाळा सुरू आहे. अजून बराच बाकी असला, तरी यंदा वणव्यांनी पहिल्याच टप्प्यात हाहाकार म्हणावा, अशी स्थिती आणली आहे. त्यात सर्वाधिक होरपळ होत असलेले देश फ्रान्स आणि स्पेन. तुर्कीये, पोर्तुगालमध्येही धग आहे आणि गेल्या दोन-तीन दिवसांत ग्रीस, ब्रिटनलाही झळ पोहोचू लागली आहे. पश्चिम युरोपात यंदाच्या हिवाळ्यात आणि वसंत ऋतूत पाऊस अधिक पडला. त्यामुळे जंगलात मोठ्या प्रमाणात गवत, झाडेझुडपे वाढली. ती उन्हाळ्याच्या सुरुवातीला वाळली आणि त्यांनी वणवे वेगाने पसरविण्यास हातभारच लावला. फ्रान्स गेल्या आठेक दिवसांपासून वणवे विझविण्यासाठी झगडतो आहे. आता कुठे परिस्थिती नियंत्रणात येते आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या मते, फ्रान्समध्ये अशी आग दुसऱ्या महायुद्धानंतर कदाचित प्रथमच पाहायला मिळत असावी. या देशाच्या बोर्दो शहरानजीकच्या भागाची सर्वाधिक हानी झाली आहे. गेल्या २२ जुलैपासून तेथे वणवे झपाट्याने पसरले. वने, शेते अक्षरश: खाक झाली. भस्मसात झालेल्या भागाचे क्षेत्रफळ ४२० चौरस किलोमीटर, म्हणजे पॅरिस शहराच्या चौपट आहे. या वणव्यांच्या धगीमुळे तब्बल दोन लाख लोकांना स्थलांतरित करावे लागले. ज्वाळा बोर्दो या शहरापासून (होय, हेच ते वाईन उत्पादनासाठी जागतिक पातळीवरील उत्तम दर्जाची द्राक्षे आणि द्राक्षमळे यासाठी प्रसिद्ध असलेले शहर) १५ किलोमीटर अंतरापर्यंत पोहोचल्या होत्या. पण, अखेर आगीवर नियंत्रण मिळाल्याने मोठा अनर्थ टळला, असे आता म्हटले जाते. कारण, या परिसरात फ्रान्सची संवेदनशील औद्योगिक क्षेत्रे आहेत, ज्यात बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे निर्मिती, रॉकेट उत्पादन आणि घातक रसायनांवरील प्रक्रिया उद्योगांचा समावेश आहे.

स्पेनमध्येही तीव्रता काही कमी नाही. एक जुलैपासून लागलेल्या वणव्यांमध्ये माद्रिद शहरानजीकचा १५७० चौरस किलोमीटर प्रदेश जळून खाक झाला. हा प्रदेश माद्रिद शहराच्या एकूण क्षेत्रफळाच्या दुप्पट भरतो. त्यातच आता उष्णतेच्या आणखी लाटांचा अंदाज. फ्रान्समध्ये जरा कुठे वणव्यांवर नियंत्रण मिळते आहे, तर तापमान ४१ ते ४२ अंशांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आल्याने पुन्हा वणव्यांसाठी सज्ज राहण्याचे आव्हान. पूर्व इंग्लंडमध्ये उन्हाळी सुटीला गेलेल्या अनेकांना वणव्यांमुळे नुकतेच हलवावे लागले. सुमारे २५० एकर जमीन ज्वाळांत लपेटून घेतलेला हा वणवा आण्विक ऊर्जा प्रकल्पापासून चार मैल अंतरावर येऊन ठेपला.

# जिल्हा न्यायाधीशांसह शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची क्षेत्रभेट

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे** : “गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणजे नेमके काय?” याचे जिवंत उदाहरण पाहायचे असेल, तर ते नगर परिषद शाळा क्र. २, दारव्हा येथे पाहायला मिळते, अशा शब्दांत वरिष्ठ मान्यवरांनी आज (दि. १ ऑगस्ट २०२६) ला शाळेच्या कार्याचे कौतुक केले.

यवतमाळचे सन्माननीय जिल्हा न्यायाधीश श्री. संजयसिंग बघेल यांच्या प्रमुख उपस्थितीत न्यायव्यवस्था व शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळेची सविस्तर क्षेत्रभेट घेतली. या भेटीदरम्यान शाळेतील अध्यापन प्रक्रिया, डिजिटल वर्गखोल्या, स्वच्छता, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धा परीक्षा तयारी, भौतिक सुविधा तसेच शिक्षकांची कार्यपद्धती यांची बारकाईने पाहणी करण्यात आली.

इयत्ता १ ली ते १० वीपर्यंतच्या प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधण्यात आला. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, अभ्यासातील



प्रगती आणि शिक्षकांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते पाहून मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेली मेहनत आणि शाळेतील सकारात्मक शैक्षणिक वातावरण, स्पर्धा परीक्षा मधील एनएमएमएस शिष्यवृत्तीपरीक्षा, प्रज्ञाशोध, नवोदय या परीक्षेतील विद्यार्थ्यांना मिळालेले घवघवीत यश याचे विशेष कौतुक करण्यात आले.

विशेष म्हणजे, राज्यभर इंग्रजी माध्यमाकडे वाढणारा कल आणि अनेक शासकीय शाळांसमोरील आव्हाने असताना ३,०५२ विद्यार्थ्यांची पटसंख्या असलेली नगर परिषद शाळा क्र. २, दारव्हा ही आपल्या गुणवत्तेच्या बळावर महाराष्ट्रात वेगळी ओळख निर्माण करत असल्याचे मान्यवरांनी गौरवोद्गारांतून नमूद केले. शाळेची गुणवत्ता अधिक वृद्धिंगत करण्यासाठी

## शाळेच्या गुणवत्ता, व पट संख्येत महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेत क्र.१ वर, डिजिटल शिक्षण व शिक्षकांच्या समर्पणाचे भरभरून कौतुक

आवश्यक उपक्रमांबाबतही शिक्षकांशी सकारात्मक चर्चा करण्यात आली.

यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. प्रकाश मिश्रा, उपशिक्षणाधिकारी मा. वंदना नाईक, जिल्हा सरकारी वकील ॲड. नीती दवे, सहायक अभियंता प्रीती म्हस्के, नगरपरिषद दरवाजे मुख्याधिकारी विठ्ठल केदारे,गटशिक्षणाधिकारी, दारव्हा श्रीमती क्रांती खेडकर, गटशिक्षणाधिकारी, नेर श्री. मंगेश देशपांडे, नगर परिषद प्रशासन अधिकारी आकाश धवणे, विस्तार अधिकारी विलास भड,माजी शिक्षणाधिकारी वाल्मीक इंगोले, दिग्रसच्या नगराध्यक्षा सौ.इंगोले ताई,अभियंता गजानन माहुरे,पोलीस उपनिरीक्षक सुरेश झोटिंग, नगरसेवक संतोष येडमे यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक रमेश राठोड यांनी सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी उपमुख्याध्यापक प्रवीणकुमार निनावे, पर्यवेक्षक सुनील जगताप, अभिजीत कपिले, बुद्धम् रंगारी सर,Iमिलींद पांडे सर तसेच शाळेचे सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

“गुणवत्ता, शिस्त, स्वच्छता, डिजिटल शिक्षण आणि विद्यार्थीकेंद्रित अध्यापन यांचा उत्कृष्ट संगम म्हणजे नगर परिषद शाळा क्र.२,दारव्हा”, अशी गौरवपूर्ण प्रतिक्रिया मान्यवरांनी क्षेत्रभेटीनंतर व्यक्त केली..

# वाड्यात अतिक्रमण हटावादरम्यान धक्काबुक्की; दोन महिलांविरोधात पोलिसांची कारवाई

महाराष्ट्र जीत

**पालघर - श्री तुषार भोईर**

**वाडा:**-वाडा नगरपंचायतीच्या अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान शासकीय कामात अडथळा निर्माण करून जेसीबी चालकाला मारहाण, शिवीगाळ व धमकी दिल्याप्रकरणी दोन महिलांविरोधात वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हा क्रमांक ३०२/२०२६ नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मधील कलम १३२, २२१, ११५(२), ३५१(२), ३५२ व ३(५) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

ही घटना ३१ जुलै २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७.१५ वाजता टीडीसीसी बँकेजवळील खंडेश्वरी नाका–परळी नाका मुख्य रस्त्यावर घडली. नगरपंचायतीची





अतिक्रमण हटाव कारवाई सुरू असताना आरोपींनी जेसीबी चालकाला चापट व बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच जेसीबीच्या चाव्या काढून घेण्याचा प्रयत्न करत शिवीगाळ व दमदाटी करून

## जेसीबी चालकाला मारहाण, शासकीय कामात अडथळा व धमकीचे आरोप; वाडा पोलिसांची कारवाई

शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

घटनेच्या वेळी काही भाजीपाला व मच्छी विक्रेते तसेच नागरिक घटनास्थळी उपस्थित होते. या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास वाडा पोलीस करीत असून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. घटनेच्या वेळी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी मनोज पष्टे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

वाहतूक कोंडीमुळे सुरू झाली मोहीम

वाडा शहरातील मुख्य रस्ते, खंडेश्वरी नाका परिसर, बसस्थानक आणि पी. जे. हायस्कूल परिसरात वाढलेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीची कोंडी व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला होता.

नागरिकांच्या सातत्यपूर्ण तक्रारीनंतर नगरपंचायतीने अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केली असून सार्वजनिक रस्ते व पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी ही कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याची माहिती मुख्याधिकारी मनोज पष्टे यांनी दिली.

# ‘अंनिस’चे कमलाकर जमदाडे यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न; बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र जीत

**नांदेड जिल्हा प्रतिनिधी: दिपक केसराळीकर** : अंधश्रद्धा, बुवाबाजी,भोंदूगिरी, बनावट चमत्कारांविरोधात सातत्याने जनजागृती करणारे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (अंनिस) राज्य सहकार्यवाह तथा पत्रकार कमलाकर चंद्रकांत जमदडे यांच्यावर जीवघेण्या हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध बिलोली पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ ते ६:३० वा. दरम्यान कासराळी– रुद्रापूर रस्त्यावर ही घटना घडली. फिर्यादी कमलाकर जमदडे हे बिलोलीहून



गावाकडे जात असताना आरोपी ज्ञानेश्वर नागोराव करडे याने आपली दुचाकी रस्त्यात लावून त्यांचा रस्ता अडवला. त्यानंतर आरोपीने जमदडे यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. काही दिवसापूर्वी अंधश्रद्धा निर्मूलनाशी संबंधित झालेल्या कार्यवाहीचा राग मनात धरूनच आरोपीने हा कट कारस्तान केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल

या घटनेप्रकरणी बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ०१६३/२०२६रोजी नोंदवण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ अंतर्गत कलम २८१, १२६(२), ३५१(२) आणि ३५१(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गंगाप्रसाद चंदरराव मिरदोडे करत आहेत. भोंदूगिरीविरोधात लढणाऱ्या कार्यकर्त्यावर अशा प्रकारे उघडपणे हल्ल्याचा प्रकार घडल्याने परिसरात खळबळ उडाली असून, आरोपीवर कठोर कारवाई करण्याची पुढे असा प्रकार घडणार नाही याची खबरदारी घेण्याची मागणी सामाजिक वर्तुळातून जोर धरू लागली आहे.

# दाढेगावचा वालदेवी नदीचा पूल बनणार संकट मोचन गिरीश भाऊ महाजन यांचे ग्रामस्थांना आश्वासन – अमित जाधव

महाराष्ट्र जीत

**नाशिक रोड प्रतिनिधी गोकुळ लोखंडे** : अनेक वर्षापासून मनपा प्रभाग क्रमांक ३१ मधील दाढेगाव - पाथर्डी रस्त्यावरती वालदेवी नदीचा पूल बनावा अशी मागणी सातत्याने ग्रामस्थांकाडून होत आहे परंतु अद्यापपोहत मागील खासदार, आमदार सर्वच लोकप्रतिनिधींनी फक्त उद्घाटन व आश्वासन सोडले तर दुसरे काही दिले नाही

पुलाची उंची कमी असल्यामुळे आतापर्यंत अंदाजे २४ नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे तसेच पावसाचा पूर आला तर पशुधनाची देखील हानी होते यापूर्वीही शेतकऱ्यांच्या गाई, म्हशी, शेळ्या यात वाहून गेलेल्या आहे. आताही शुक्रवारी



सायंकाळी एक मोटर सायकल स्वार यात वाहून गेला आहे दोन दिवसापासून एनडीआरएफ बचाव पथकाची शोध मोहीम सुरू आहे परंतु अद्याप पोहोत देखील युवकाचा शोध लागला नाहीये

यासाठी भारतीय जनता पार्टीचे युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अमित जाधव यांनी दाढेगाव येथील ग्रामस्थांना भेटून आपत्ती व्यवस्थापन मंत्री यांचे स्वीय सचिव संदीपजी जाधव यांच्या मार्फत मा.ना गिरीश भाऊ महाजन व महापौर हिमगौरी ताई आडके यांच्याशी फोन द्वारे संपर्क करून दिला यावर गिरीश भाऊ महाजन यांनी क्षणाचाही विलंब न करता ग्रामस्थांना भेटण्यासाठी वेळ दिली व शुक्रवारी सायंकाळीच गावातील ग्रामस्थ व अमित जाधव यांनी गिरीश भाऊ महाजन यांना निवेदन दिले. महाजन यांनी तत्काळ निवेदन स्वीकारत एन डी आर एफ च्या टीम सोबत संपर्क साधला व नाशिक मनपा महापौर हिमगौरी ताई आडके व मनपा आयुक्त मनीषा खत्री मॅडम तथा स्थायी समिती सभापती मच्छिंद्रजी सानप यांना बोलावून सदरच्या पुलाची पाहणी करून तत्काळ प्रस्तावना बनवण्याचे व निधी उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. यामुळे गावकऱ्यांनी गिरीश भाऊ यांचे आभार मानले यावेळी जाधव यांच्या समवेत दाढेगाव येथील पंढरी भोर, संदीप भोर, रवि सोनवणे,आनंद जाधव,भाऊसाहेब भोर, कार्तिक भोर आदी उपस्थित होते

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# कारंजा बसस्थानकातील सिमेंट कॉँक्रिट रस्त्याची दयनीय अवस्था; उघडे लोखंडी गज व खड्ड्यांमुळे गंभीर अपघाताचा धोका








महाराष्ट्र जीत

**कारंजा (लाड) प्रतिनिधी :** कारंजा (लाड) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानक परिसरात मोठ्या खर्चातून नुकताच बांधण्यात आलेला सिमेंट कॉँक्रिटचा रस्ता अवघ्या एक ते दोन वर्षांच्या आतच उखडून पडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. विकासकामांच्या गुणवत्तेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण करणारे हे चित्र असून, बसस्थानक परिसरातील रस्ता ठिकठिकाणी तुटून गेला आहे.

रस्त्यावरील सिमेंटचा थर पूर्णपणे निघून गेला असून अनेक ठिकाणी गिट्टी बाहेर आली आहे. मोठमोठे खड्डे पडल्याने बसस्थानकात येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांना, दुचाकीस्वारांना तसेच पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

## निकृष्ट कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करा; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा — बिमोद मुधाने

विशेषतः बसच्याटायरांना नुकसान होण्याबरोबरच दुचाकी घसरून अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांनी सांगितले की, रस्ता तयार होताना दर्जेदार काम झाले नसल्याची शंका त्यावेळीच व्यक्त करण्यात आली होती. मात्र संबंधित यंत्रणांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. आता रस्ता अल्पावधीतच उखडल्याने सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

या प्रकरणी बहुजन मुक्ती पार्टीचे यवतमाळ-वाशीम लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. "सिमेंट कॉँक्रिटचा रस्ता साधारणतः अनेक वर्षे टिकणे अपेक्षित असताना तो अवघ्या एक-दोन वर्षांत खराब होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले का? तांत्रिक मानकांचे पालन झाले का? संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा केला का? याची उच्चस्तरीय चौकशी झाली.पाहिजे," अशी मागणी त्यांनी केली.

तसेच संबंधित कंत्राटदाराकडून नुकसानभरपाई वसूल करून रस्ता नव्याने दर्जेदार पद्धतीने बांधण्यात यावा, उघडे पडलेले लोखंडी गज तात्काळ हटवावेत, सर्व खड्डे त्वरित बुजवावेत आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी संरक्षणात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

दरम्यान, प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने बसस्थानक परिसरात तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा बिमोद मुधाने यांनी दिल्याने या प्रकरणाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. नागरिकांनीही "अपघात झाल्यानंतर नव्हे, तर त्यापूर्वी प्रशासन जागे व्हावे," अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

---

## लॅम रोड येथील ओम शांतीनगर मित्र मंडळ कडून लोकशाही अण्णाभाऊ साठे यांना १०६ जयंतीच्या निमित्त अभिवादन

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** शांतीनगर मित्रमंडळाच्या वतीने विविध उपक्रमाचे आयोजन करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करत मिरवणूक चित्ररथ काढण्यात आला यावेळी आमदार सरोज अहिरे माजी नगरसेवक दिनकर पाळदे विलास,चंद्रकांत गोडसे,रिपाई नेते सुभाष बोराडे, रविंद्र धुर्जड,रोहित भालेराव, संकेत निकम,किरण शिंदे,राहुल वाडेकर, आदी



मान्यवर उपस्थित होते मंडळाचे पदाधिकारी भारत वाघमारे,अजय बुलाखे, नितीन जोगदाणे,दिनेश बोराडे,विनोद रोकडे,सागर बुलाखे, सजिन जगधने,विनोद खाडे, दुर्गेश जगधने,संदीप बुलाखे,शुभम तांबे, आदित्य गांगुर्डे,जालिंदर बोराडे, दुर्गेश रोकडे,देव बोराडे,आदी उपस्थित होते यावेळी सूत्रसंचालन भारत वाघमारे यांनी तर आभार नितीन जगधने यांनी मानले

## राष्ट्रीय महामार्गांवरील अतिक्रमण हटविण्याचे आदेश; कारंज्यातील राज्य महामार्गावरील अतिक्रमणांसह मटण दुकानांवरही कारवाईची मागणी

महाराष्ट्र जीत

**कारंजा (लाड), दि. २ ऑगस्ट** — राज्यातील राष्ट्रीय महामार्गांच्या हद्दीतील सर्व अतिक्रमणे ६० दिवसांच्या आत हटविण्याचे कडक आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर कारंजा (लाड) शहरातही या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्यावर संयुक्तपणे अतिक्रमण हटाव मोहिमेची जबाबदारी सोपविण्यात आली असून, राज्य सरकारनेही तातडीने कारवाईचे निर्देश दिले आहेत.

मात्र, सध्या हे आदेश राष्ट्रीय महामार्गांपुरते मर्यादित असल्याचे स्पष्ट झाले आहे. कारंजा शहरातून जाणाऱ्या राज्य महामार्गालगत मोठ्या प्रमाणावर झालेल्या अतिक्रमणांवरही प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून पुढे येत आहे.

महामार्गालगत उभारण्यात आलेली मटण व कोंबडी विक्रीची दुकानेही नियमबाह्य असल्यास हटविण्यात यावीत, अशी मागणी काही नागरिकांनी केली आहे. महामार्गाच्या अगदी कडेला उभारलेल्या अशा दुकानांमुळे वाहनांची गर्दी, अचानक थांबणारी वाहने, स्वच्छतेचे प्रश्न आणि वाहतूक सुरक्षेचे धोके निर्माण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राष्ट्रीय महामार्गांवरील अतिक्रमणांवर मोठी कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात असताना, कारंज्यातील राज्य महामार्गावरील अतिक्रमणांवर तसेच महामार्गालगतच्या नियमबाह्य मटण दुकानांवरही अशीच मोहीम राबविण्यात येणार का? असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत.

प्रशासनाने राज्य महामार्गांची मोजणी करून वाहतूक सुरक्षेला धोका निर्माण करणारी अतिक्रमणे हटवावीत, तसेच संबंधित दुकाने परवानाधारक आहेत का, स्वच्छता व अंतराचे नियम पाळले जात आहेत का, याची तपासणी करावी, अशी मागणी व्यापारी, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.दरम्यान, जिल्हा प्रशासनाकडून राज्य महामार्गांवरील अतिक्रमणांबाबत अद्याप कोणतीही अधिकृत कारवाई जाहीर करण्यात आलेली नसली, तरी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर या विषयाकडे प्रशासन गंभीरपणे पाहणार का, याकडे कारंजेकरांचे लक्ष लागले आहे.

---

## अण्णाभाऊ साठे जयंती रथाचे जंगी स्वागत

महाराष्ट्र जीत

**देवळाली प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती रथाचे उदघाटन नासिक देवळाली कॅम्प लामरोड सहा नंबर नाका ,शनी मंदिर येथे आमदार सरोजताई अहिरे यांचा हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार महाराष्ट्र शासन व रिपाई नासिक जिल्हा उपाध्यक्ष सुभाष पोपटराव बोराडे यांच्या हस्ते पुष्पहार घालून व श्रीफळ



फोढुन रथाचे उदघाटन करण्यात आले तर

लामरोड भिमस्तंभावर रिपाई प्रणित बि.फाऊडेशनच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या मिरवणूक रथाचे स्वागत व प्रमुख पदाधिका-याचा सत्कार मा.सुभाष पोपटराव बोराडे व रिपाई नेते महेंद्र बोराडे युवा नेते रोहित सुनील भालेराव व वार्ड अध्यक्ष सचिन बोराडे , कार्याध्यक्ष योगेश बोराडे व पदाधिकाऱ्यांनी केले .यावेळी भिमस्तंभावरील महापुरुषांच्या प्रतिमेस प्रमुख अतिथीनी पुष्पहार अर्पण करून पुजन केले, यावेळी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष दिनकरराव पाळदे , रिपाई जेष्ठ नेते किरणभाई मोमाया ,माजी नगरसेवक,शिवसेना नेते चंद्रकांत (नाना) गोडसे, समाज भुषण सुभाषजी बोराडे , रिपाईनेते महेंद्र बोराडे युवानेते भारत वाघमारे , विक्रांत बागुल,यांच्या हस्ते पुष्पहार घालून पुजन केले तर जयंती अध्यक्ष सचिन जगधने, यांना शाल देवून स्वागत व सत्कार केला यावेळी रिपाई नेते अजय बुलाखे, दिनेश बोराडे,संदिप बुलाखे,मनोज रोकडे विनोदी रोकडे नितीन जगधने,शुभम तांबे ,यांचे शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार केले यावेळी भर पावसात महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थिती लावली याठिकाणी घोषणाबाजी करुन डिजे वाजवून,फटाके फोडून, नाचुन आनंदोत्सव साजरा केला .

## शिकता शिकता कमवा कार्य शाळेचे आयोजन

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत प्रतिनिधी संजय वानखेडे मोर्शी** : स्थानिक भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग आणि अर्थशास्त्र विभागाअंतर्गत शिकता शिकता कमवा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना मार्केटिंग, बँकिंग, आणि विविध क्षेत्रातील उद्योगांशी माहिती व्हावी हा होता या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष आगरकर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा.महेंद्र भातकुले उद्योजक तथा समाजसेवक मोर्शी हे होते. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोर्शीमध्ये असलेल्या विविध उद्योगांची आणि त्यात निर्मित विविध वस्तूंची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शिकता शिकता छोटा व्यवसाय सुरू करून पैसे कमविण्याचे तंत्र शिकावे. यातून




स्वतःच्या गरजा स्वतःच्या पैशातून भागविण्याचे आत्मभान विद्यार्थ्यांमध्ये येइल. स्वावलंबन म्हणजे काय हे त्यांना कृतीतून कळते अशा प्रकारचे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. तर अध्यक्षीय विचार व्यक्त करताना प्राचार्य डॉ. संतोष आगरकर यांनी भातकुले सरांनी मांडलेली संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यात यावी आणि त्यासाठी विद्यार्थ्यांनी परिश्रमाची तयारी ठेवून शिकता शिकता पैसा कमवा असे मत अध्यक्षीय विचार व्यक्त करण्यात



आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व कार्यशाळा आयोजन प्रा.अरविंद पाझारे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. लाजवंती टेंभुर्णे यांनी केले कार्यक्रमाला डॉ. रजनीश बांबोळे ,डॉ.संदीप राऊत, नॅक समन्वयक डॉ. सावन देशमुख, डॉ. दीपक काळे प्रा. सुरेंद्र पांडे, प्रा. बावणे, प्रा. विजय बोरवार, प्रा. श्री सुरज खोब्रागडे, प्रा. श्री विनायक देशपांडे प्रा. श्रीमती भारती पंचगाम, प्रतीक वहिले, प्रभाकर सिडम बहुसंख्येने प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यशाळेची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## शिंदवणे येथे साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव साजरा





महाराष्ट्र जीत

**हवेली । शिंदवणे (शामराव जगताप) :** शनिवार, दि. ०१ ऑगस्ट, २०२६ रोजी शिंदवणे, ता. हवेली, जि. पुणे येथे साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी पंचायत समिती हवेली माजी उपसभापती हेमलता बडेकर, शिंदवणे माजी सरपंच तथा प्रशासक प्रमिला शितोळे, माजी सरपंच गणेश महाडीक, संजय डोंबाळे, सारीका दि. महाडीक, माजी उपसरपंच भाग्यश्री शिंदे, लता माने, माजी तंटामुक्ती समिती अध्यक्ष नानासो महाडीक, वि. का. सहकारी सोसायटी माजी चेअरमन बबन खेडेकर, रयत शेतकरी संघटनेचे नेते संतोष महाडीक, पत्रकार भाऊसाहेब महाडीक, हरिभाऊ नवगिरे, सोमनाथ खेडेकर, सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय महाडीक, अशोक कांबळे, भाऊसाहेब कांबळे, अविनाश कांबळे, रोहित शिंदे, अक्षय शिंदे, हर्षल शिंदे, अनिल शिंदे, अमर कोतवाल, माऊली जाधव, रोहिदास भंडलकर, अनिल महाडीक, राहूल महाडीक, यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंतीचे अनुषंगाने प्रदीप शेंडगे यांनी प्रबोधन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सदाशिव कांबळे यांनी तर आभार विनोद शिरवाळे यांनी मानले. यावेळी साईशा शिरवाळे, तेजस्विनी शिरवाळे, रेणुका अवचिते, समीक्षा सोनवणे या विद्यार्थ्यांनी आण्णाभाऊ साठे यांचे जीवनावर भाषणे करुन, उपस्थितांची मने जिंकत प्रभाव टाकला. ग्रामस्थ व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अभिनंदन केले. जयंती उत्सवाप्रसंगी समाज बांधव व स्थानिक नागरिक, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेखर शिरवाळे, सचिन शिरवाळे, उमेश शिरवाळे, शुभम शिरवाळे यांनी अथक परिश्रम घेतले.

दैनिक **महाराष्ट्र जीत** सोमवार, ०३ ऑगस्ट २०२६ वाशीम जिल्हा


## चांदोरी-सायखेडा पूरप्रश्नी आमदारांना निवेदन; कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी



**निफाड प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** चांदोरी, सायखेडा व परिसरातील गावांना दरवर्षी गोदावरी नदीच्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात फटका बसत असल्याने या गंभीर समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या मागणीसाठी आज निफाड विधानसभा मतदारसंघाच्या आमदारांना वंचित बहुजन आघाडी, निफाड तालुका तसेच चांदोरी व परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने निवेदन देण्यात आले.निवेदनात चांदोरीतील गणेश नगरसह पूरग्रस्त भागातील नाल्यांचे खोलीकरण, संरक्षण भिंती उभारणे, नांदूर-मधमेश्वर धरण व गोदावरी नदीपात्रातील गाळ तातडीने काढणे, सायखेडा पुलाचे रखडलेले काम युद्धपातळीवर पूर्ण करणे, पूरग्रस्त नागरिकांना तातडीने नुकसानभरपाई देणे तसेच चांदोरी-सायखेडा परिसरासाठी दीर्घकालीन पूर संरक्षण आराखडा (Flood Protection Plan) तयार करण्याची मागणी करण्यात आली.यावेळी वंचित बहुजन आघाडीचे नेते धर्मा भाऊ जाधव, निफाड तालुका अध्यक्ष सचिन हिरे, निफाड तालुका उपाध्यक्ष गणेश भाऊ गांगुर्डे, निफाड तालुका सदस्य अजय आवचिते, पिंपळगाव शहराध्यक्ष विवेक गांगुर्डे, रितेश गवई आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या जयंती निमित्त अभिवादन

## जि प शाळा शेलू येथे वही पेन पुस्तक वाटप

**सिंदखेड राजा -उमेश एखंडे :** शेलू येथील जिल्हा परिषद शाळेत विध्यार्थी ना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या जयंती निमित्ताने पुष्पहार अर्पण करून जिल्हा परिषद शाळा मधील विध्यार्थी ना वही पेन पुस्तक वाटप करण्यात आले समाज कार्य करून प्रबोधन करण्यात आले यावेळी

अण्णाभाऊंच्या साहित्याने अन्यायाविरुद्ध लढण्याची चेतना निर्माण केली : फकिरा खंदारे . या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना दोन्ही महापुरुषांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रेरणादायी परिचय करून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र




अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गजानन एखंडे उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी एकनाथ खंदारे होते.

आयोजक फकीरा खंदारे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य जीवनवादी, वास्तववादी आणि परिवर्तनवादी विचारांचे प्रतीक आहे. त्यांच्या लेखणीतून शोषित, वंचित, कष्टकरी आणि कामगार वर्गाच्या वेदना प्रभावीपणे व्यक्त झाल्या. अन्याय, विषमता आणि शोषणाविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा त्यांच्या साहित्याने समाजाला दिली. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय हीच त्यांच्या साहित्याची मूलभूत मूल्ये असून आजच्या तरुण पिढीने त्यांचे विचार आत्मसात करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचा आढावा घेत त्यांच्या कादंबऱ्या, कथा, लोकनाट्य, पोवाडे आणि शाहिरीच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित घटकांना त्यांनी प्रभावी आवाज दिला. सामाजिक परिवर्तनासाठी साहित्य हे अत्यंत प्रभावी माध्यम असून अण्णाभाऊंचे साहित्य आजही तितकेच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रताप खंदारे यांनी केले. त्यांनी कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट करत अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या विचारांचा वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता अधोरेखित केली. सूत्रसंचालन जायभाये सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन कदम सर यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी ज्ञानदेव एखंडे, राजेभाऊ एखंडे, रामेश्वर उगले,भगवान एखंडे,यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# "सायबर गुन्हे आणि अमली पदार्थांपासून दूर राहा; सजग, जबाबदार नागरिक बना" – पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील

### ( जेजुरीत जिजामाता विद्यालयात सायबर व अमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न )

**प्रतिनिधी शाम.जगताप :** श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी या विद्यालयात पुणे ग्रामीण पोलिस व जेजुरी पोलीस स्टेशन यांच्या वतीने आयोजित सायबर व अमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, "सायबर गुन्हे आणि अमली पदार्थांपासून दूर राहा; सजग, जबाबदार नागरिक बना," असे आवाहन केले. त्यांनी सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी घ्यावयाची काळजी, ऑनलाइन फसवणूक टाळण्याचे उपाय तसेच अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करून कायद्याचे पालन करणारे आदर्श नागरिक बनावे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा आणि व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी जेजुरी पोलीस स्टेशनच्या सहायक पोलीस निरीक्षक दिपाली पवार , नामदेव तारडे तसेच पोलीस हवालदार



विनोद देशमुख यांनीही विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि अमली पदार्थांपासून दूर राहण्याबाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी "अमली पदार्थांना कायमचा नकार देऊ, व्यसनमुक्त आणि सुदृढ समाज घडविण्यासाठी प्रयत्न करू" अशी अमली पदार्थविरोधी सामूहिक प्रतिज्ञा घेतली. या प्रतिज्ञेमुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश प्रभावीपणे पोहोचला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर चव्हाण यांनी प्रभावीपणे केले, तर डॉ. मधुसूदन जगताप यांनी उपस्थित मान्यवर, पोलीस अधिकारी, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.या कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होण्यास तसेच अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती होण्यास निश्चितच मदत झाली.

कार्यक्रमाचे नियोजन जेजुरी पोलीस स्टेशनचे भूषण कदम, पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप, माध्यमिक विभाग प्रमुख प्रल्हाद गिरमे, ज्युनिअर विभाग प्रमुख किरण मोडक, सोमनाथ उबाळे,सोनबा दुर्गाडे, जयसिंग वसावे, गणेश भंडलकर, कैलास सोनवणे, महेश खाडे, कुलदीप साळवे, मयुर शिंदे, राजाराम पिसाळ, अजय जगताप, पांडुरंग आटोळे, राघू हारुळे, योगेश घोरपडे, राजेंद्र ताम्हाणे, पूनम बाठे, वैष्णवी धुमाळ , सारिका कामथे,प्राजक्ता क्षीरसागर यांनी केले.

# गुणवंत विद्यार्थ्यांसह आई-वडील व गुरुजनांचा महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघातर्फे भव्य सत्कार

### चाणक्य फाउंडेशनचे संस्थापक संचालक प्रा. मिलिंद लाहे यांचे स्पर्धा परीक्षेच्या तयारीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**कारंजा :** महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाच्या वतीने तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांसह त्यांना घडविणाऱ्या आई-वडील व गुरुजनांचा भव्य सत्कार सोहळा स्थानिक बाबासाहेब धाबेकर सभागृहात उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. पंकज काटोले होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अदिति अर्बन बँकेचे संस्थापक तथा दैनिक महाभूमीचे संपादक सुरेश देवकर, पोलीस उपविभागीय अधिकारी मनीष ठाकरे, विद्याभारती महाविद्यालयाचे प्राचार्य आर. एम. पाटील, वनपरिक्षेत्र अधिकारी गिरीश जतकर, पोलीस निरीक्षक अमर चोरे, गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने, चाणक्य फाउंडेशनचे संस्थापक संचालक प्रा. मिलिंद लाहे, महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बंडूभाऊ इंगोले, आजतकचे वाशिम-बुलढाणा प्रतिनिधी जका खान, इम्रान पोपटे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी चाणक्य फाउंडेशनचे संस्थापक संचालक प्रा. मिलिंद लाहे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना 'स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी, अभ्यास आणि नियोजन' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि ध्येय निश्चिती यावर भर देण्याचे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बंडूभाऊ इंगोले यांनी प्रास्ताविकातून पत्रकार संघाच्या कार्याची माहिती देत पत्रकार संघाची सामाजिक भूमिका आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचा उद्देश स्पष्ट केला.या






कार्यक्रमात तालुक्यातील विविध विद्यालये तसेच उच्च माध्यमिक महाविद्यालयांतील सुमारे १५० गुणवंत विद्यार्थ्यांचा, तसेच त्यांना घडविणाऱ्या आई-वडील व शिक्षकांचा शाल, पुष्पगुच्छ, फाईल, मोमेंटो आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यासोबतच त्यांच्या यशामागे असलेल्या पालक व गुरुजनांच्या योगदानाचा गौरव करण्यात आल्याने या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत पापळे यांनी केले, तर आभार विजय भड यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे जिल्हा सचिव रामदास मिसाळ, तालुकाध्यक्ष आरिफ पोपटे, उपाध्यक्ष कालूभाई तवगड, शहराध्यक्ष संदीप कुर्हे, शहर उपाध्यक्ष सलीम खान, प्रसिद्धीप्रमुख विनोद गणवीर, अजय काकडे, श्रवण किन्हिकर, बबलू शेख, मयूर राऊत, गजानन टोंपे, विजय खंडार, सौ. उषा नाईक, सौ. मोनाली कुलकर्णी (गणवीर), अब्बदुल जुबेर, ज्ञानेश्वर वरघट, महादेव जाधव, महेंद्र गुप्ता, राजेंद्र श्यामसुंदर, जिग्नेश लोडाया, दामोधर जोधालेकर, निलेश मुंदे, दीपक इंगळे आदींनी परिश्रम घेतले.

# दिव्यात पुन्हा अनधिकृत बैठ्या चाळींचा सुळसुळाट!

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) ठाणे दिवा** - माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील ए.व्ही.के. कंपाउंडमधील तोडक कारवाईनंतर काही काळ अनधिकृत बांधकामांवर प्रभावी नियंत्रण आल्याचे चित्र दिसत होते. मात्र पावसाळा सुरू होताच अनधिकृत बांधकाम व्यावसायिक पुन्हा सक्रिय झाल्याचे समोर येत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, शनिवार-रविवार या शासकीय सुट्टीच्या दिवसांचा फायदा घेत दिवा प्रभाग समिती क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बैठ्या चाळी उभारल्या जात आहेत. विकास म्हात्रे गेट परिसरातील सीताराम म्हात्रे नगर मधील बेडेकर नगरच्या मागील भागात सध्या मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम सुरू असून, शनिवारी काम सुरू करून रविवारी




सायंकाळपर्यंत संपूर्ण बैठ्या खोल्या उभारल्या जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

विशेष म्हणजे, हे प्रकार सुरू असतानाही ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समिती प्रशासनाकडून तातडीची कारवाई होत नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, या अनधिकृत बांधकामांकडे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संबंधित पालिका अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष का होत आहे? नागरिकांकडून वारंवार तक्रारी होत असतानाही प्रतिबंधात्मक कारवाई का केली जात नाही? अनधिकृत बांधकामांना कोणाचे संरक्षण मिळत आहे का? असे प्रश्नही नागरिक उपस्थित करत आहेत.

जर संबंधित अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या कायदेशीर जबाबदाऱ्या पार पाडण्यात कसूर केली असल्याचे सक्षम चौकशीत निष्पन्न झाले, तर त्यांच्यावर लागू असलेल्या कायद्यांनुसार व महापालिका अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार प्रशासकीय व शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

(संबंधित लोकप्रतिनिधी व ठाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची भूमिका उपलब्ध झाल्यानंतर तीही प्रसिद्ध करण्यात येईल.)

# दिव्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी बेमुदत आमरण उपोषण सुरू

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) ठाणे (दिवा) :** दिवा शहरामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी (दि. २ ऑगस्ट) रोजी सकाळी ११ वाजल्यापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक, दिवा येथे बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात करण्यात आले आहे.

या आंदोलनाचे नेतृत्व समाजसेविका सुवर्णा श्रावण कांबळे व युवा सामाजिक कार्यकर्ते सौरव संदीप अडांगळे करत असून, विविध आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी उपोषणस्थळी उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.




आंदोलनकर्त्यांनी दिवा शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने ठाणे महानगरपालिकेच्या महासभेत मंजूर करून पुढील कार्यवाही सुरू करण्याची मागणी केली आहे. जोपर्यंत मागणी मान्य होत नाही, तोपर्यंत उपोषण सुरूच राहील, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

उपोषणस्थळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. परिसरात शांततेत आंदोलन सुरू असून, नागरिकांचे लक्ष या आंदोलनाकडे लागले आहे.

आंदोलनाच्या पुढील घडामोडीकडे आता प्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.